


## महाविकास आघाडी सरकारच्या काळात

# विद्यार्थ्यांचे प्रश्न गंभीर नव्हते का?

## सुधीर मुनगंटीवारांचा शरद पवारांवर हल्लाबोल

**मुंबई । वृत्तसंस्था**

पुण्यात एमपीएससी विद्यार्थी दोन दिवसांपासून रस्त्यावर उतरले आहेत. आयबीपीएसची परीक्षा व एमपीएससीकडून घेण्यात येणारी नियमित राज्य सेवा संयुक्त पूर्व परीक्षा या दोन परीक्षा एकाच दिवशी आल्यामुळे दोन्ही परीक्षा देणाऱ्या उमेदवारांसमोर पेच निर्माण झाला होता. त्यामुळे एमपीएससीची परीक्षा पुढे ढकलण्यासाठी विद्यार्थ्यांनी पुण्यात आंदोलन सुरू केले. यानंतर राज्य सरकारने २५ ऑगस्ट रोजी होणारी परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला. मात्र, कृषी विभागाच्या २५८ पदांचा समावेश त्यामध्ये करण्याच्या मागणीबाबत कोणताही निर्णय झाला नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आंदोलन सुरूच ठेवले आहे.



या पार्श्वभूमीवरच शरद पवारांनी या आंदोलनाला पाठिंबा देत सरकारने या विद्यार्थ्यांची मागण्यांची दखल न घेतल्यास आंदोलनात उतरणार असल्याचा इशारा शरद पवारांनी दिला. यानंतर आता भाजपा नेते सुधीर मुनगंटीवार यांनी शरद पवारांवर हल्लाबोल केला. महाविकास आघाडी सरकारच्या काळात विद्यार्थ्यांचे प्रश्न गंभीर नव्हते का?, असा सवाल मुनगंटीवार यांनी केला.

**मुनगंटीवार काय म्हणाले?**

बदलापूर सारख्या कोणत्याही घटनांचे कोणीही राजकारण करू नये. बदलापूरची अतिशय वेदना देणारी घटना आहे. बदलापूरच्या घटनेतील आरोपीला कडक शिक्षा देण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येतील. त्यामुळे विशेष करुन अशा घटनेचे कोणीही राजकारण करू नये. अशा घटना करणाऱ्याला कडक शिक्षा देण्याच्या दृष्टीने प्रयत्न केला पाहिजे. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना हिंगणघाटमध्ये एका महिलेला जिवंत जाळून टाकण्याची घटना घडली होती. मात्र, तेव्हा त्याचे राजकारण कोणीही केले नाही. असे सुधीर मुनगंटीवार म्हणाले.

**'मविआ'वर टीका**

शरद पवार यांनी एमपीएससी विद्यार्थ्यांच्या आंदोलनात सहभागी होण्याचा इशारा दिला. यावर बोलताना सुधीर मुनगंटीवार म्हणाले, महाविकास आघाडीचे सरकार असतानाही विद्यार्थ्यांची आंदोलने झाली. मग तेव्हा महाविकास आघाडी सरकारच्या काळात विद्यार्थ्यांचे प्रश्न गंभीर नव्हते का? मग तेव्हा शरद पवार मैदानात उतरले नाहीत. अशी टीका मुनगंटीवार यांनी केली.

### उद्धव ठाकरेंनी काँग्रेसचे उपरणे घातले

उद्धव ठाकरे यांनी काँग्रेसच्या मेळाव्यात काँग्रेसचे उपरणे घातले होते. त्यामुळे महाविकास आघाडी म्हणजे जागांसाठी ते लढत नाहीत. उद्धव ठाकरे यांनी स्पष्ट सांगितले आहे की, त्यांना मुख्यमंत्रिपद दिले नाही तरी चालेल. आता अजून दोन दिवसांनी ते सांगतील की, मला जागा दिल्या नाही तरी चालेल. भाजपाला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी त्यांनी काँग्रेसचे उपरणे घातले. आता विधानसभेच्या जागा देखील काँग्रेसला देतील. अशी खोचक टीका सुधीर मुनगंटीवार यांनी उद्धव ठाकरेंवर केली.

# मुंबईतील ईडी कार्यालयावर काँग्रेसचा मोर्चा

## अदानी घोटाळ्याची चौकशी करण्याची मागणी

**मुंबई । वृत्तसंस्था**



भारतातील प्रसिद्ध उद्योगपती गौतम अदानी यांच्या विरोधात काँग्रेस पक्ष आक्रमक झाला आहे. गौतम अदानी यांच्या घोटाळ्याची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी काँग्रेसने ईडीकडे केली आहे. खासदार वर्षा गायकवाड यांच्या नेतृत्वात मुंबईतील ईडी कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात आला आहे.

**घोटाळ्याची चौकशी व्हावी**

उद्योगपती गौतम अदानी यांनी केलेल्या घोटाळ्याची चौकशी व्हावी. हि आंदोलन करणाऱ्या लोकांची प्रमुख मागणी आहे. या मागणीसाठीच मोर्चा काढण्यात आला आहे. या मोर्चावेळी अनेक कार्यकर्ते आक्रमक झाले होते. मोर्चावर नियंत्रण मिळवण्यासाठी ईडी कार्यालयाबाहेर मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला आहे. त्याचबरोबर पोलिसांकडून मोठ्या प्रमाणात धरपकड सुरू आहे.

**खासदार वर्षा गायकवाड यांच्या नेतृत्वात मोर्चा**

काँग्रेसच्या खासदार वर्षा गायकवाड यांच्या नेतृत्वात मोर्चा काढण्यात आला आहे. अदानी देशाची लूट करत आहे. अशा प्रकारचे बॅनर्स दाखवून कार्यकर्त्यांनी अदानी यांचा निषेध केला आहे. मसेबीने दिली सूट अदानी करतोय लूटफ असे बॅनर दाखवण्यात आले. त्यामुळे ईडी कार्यालयाबाहेर मोठा गोंधळ उडाला आहे.

एस.व्ही.के.एम. संचालित
तपनभाई मुकेशभाई पटेल मेमोरियल हॉस्पिटल, मेडिकल कॉलेज व रिसर्च सेंटर (प्रस्तावित)


SVKM

SVKM'S NMIMS® Deemed to be UNIVERSITY

यांच्या वतीने

मुंबई येथील सुप्रसिद्ध, नामांकित तज्ञ डॉक्टर्स हे तपासणी व उपचार करतील.

मा. भाईसाहेब श्री. भूपेशभाई रसिकलाल पटेल
(जॉईंट प्रेसिडेंट, एस.व्ही.के.एम., मुंबई)
यांच्या वाढदिवसानिमित्त



शिरपूर तालुक्यातील सर्व नागरिक बंधू, भगिनी यांच्या साठी

भव्य रोग तपासणी, चिकित्सा व निदान शिबीर

शनिवार, 24 ऑगस्ट 2024 | सकाळी 9 ते संध्याकाळी 5 वाजेपर्यंत

शिबीर ठिकाण : एस.व्ही.के.एम. संचालित तपनभाई मुकेशभाई पटेल मेमोरियल हॉस्पिटल, मेडिकल कॉलेज व रिसर्च सेंटर (प्रस्तावित), खर्दे बु. ता. शिरपूर, जिल्हा धुळे, महाराष्ट्र 425405.

ak media 238222

विविध रोग तपासणी साठी उपलब्ध डॉक्टर्स सुविधा :

- नेत्र तपासणी
- हाडांचे आजार
- जनरल फिजिशिअन
- छातीचे आजार
- डायबेटीस
- थायरॉईड
- मूत्रपिंड आजार
- हृदय उपचार
- नाक, कान, घसा
- बालरोग
- स्त्री रोग
- एंडोक्रीनोलॉजी

टीप : सदर शिबीरात नाव नोंदणी करणाऱ्या प्रथम 1,000 रुग्ण बंधू भगिनी साठी

Mukesh Patel Charitable Trust

सौजन्य : कु. द्वेता भूपेशभाई पटेल, मुकेश पटेल चॅरिटेबल ट्रस्ट, 'अस्तित्व', शिरपूर जिल्हा धुळे

astitva INITIATIVE BY MUKESH PATEL CHARITABLE TRUST

देशदूत
हे दैनिक मुद्रक व प्रकाशक **राजेंद्र कृष्णराव सोनवणे** यांनी श्रीरंग प्रकाशन प्रा.लि.यांच्याकरिता सकाळ मीडिया प्रा.लि., प्लॉट नं.सी-३, एम.आय.डी.सी.एरिया टेलिफोन एक्सचेंजसमोर, औरंगाबाद रोड, जळगाव-४२५००३ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून देशदूत कार्यालय, अमर चित्र मंदिर चौक, नंदुरबार-४२५४१२ येथे प्रसिध्द केले. ● **व्यवस्थापकीय संपादक : विक्रम सारडा.** ● **संपादक : हेमंत दिनेश अलोने*. फोन नं.**: नंदुरबार-२२११०१, जळगाव शहर कार्यालय-२२२८७८१, २२२४६६०, भुसावळ-२२०६८०, २२४७९५, रावेर-२५०४४४, धुळे-२३७९१४, फॅक्स-२३८९१४. **RNI.No. 69123/1998.** (* पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.)

cmyk